ISSN 2277-8721

Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)
Bi-monthly Reviewed Journal Nov/Dec 2013

# स्वातंत्र्य भारताच्या नियोजित आर्थिक विकासाच्या धोरणांच्या यशापयशाचे समिक्षात्मक अध्ययन

**डॉ. आर. डी. सिकची**

**प्राचार्य , श्रीमती .राधाबाई सारडा महाविद्यालय,**

**अंजनगाव सुर्जी , जि. अमरावती ४४४०५**

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्य भारताच्या निर्मिती नंतर भारतीय राजकारणी आणि अर्थतज्ञ यांच्या समोर प्रमुख समस्या होती ती म्हणजे आर्थिक विकास साधणे. १५० वर्षा पर्यंत ब्रिटिशांच्या शोषणानंतर भारतीय अर्थव्यवस्था पूर्णत: दुरावस्थ झाली होती ज्यामुळे नियोजित आर्थिक विकास साधतांना अडचणी येत होत्या ज्याचा परिणाम भारताच्या विकासावर होतांना दिसत असल्याचे तत्कालीन विचारवंतांनी स्पष्ट केले आहे. आर्थिक कोंडी सोडवून नियोजनबद्ध विकास साध्यकरण्याकरिता १९५० मध्ये नियोजन मंडळाची सथापना करण्यात आली आणि या मंडळाच्या शिफारशीनुसार पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकास साध्य करण्याच्या प्रयत्नांना सुरवात झाली. भारताच्या आर्थिक विकासाचा विचार केल्यास आणि यशापयशाचा विचार केल्यास आपणास आर्थिक विकासात झालेली प्रगती दिसून येते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा विचार केल्यास दोन टप्यांचा विचार करावा लगतो १९५०-१९९० आणि १९९० च्या नंतरचा काळ कारण जागतिकीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्थेच्य विकासाचे संदर्भ बदलेले दिसतात.

देशाच्या राष्ट्रीय व दरडोई उत्पन्नात दिर्घकाळापर्यंत होत जाणारी वाढ किंवा सुधारणा म्हणजे आर्थिक विकास होय. भारताच्या आर्थिक विकासाचा विचार करतांना जागतिकीकरणापूर्वीचा आणि जागतिकीकरणानंतरच्या आर्थिक विकासाचा विचार करणे आवश्यक आहे आणि या दोन भागाचा विचार केल्यास भारतीय अर्थव्यवस्थे समोरील आवाहने आपल्या लक्षात येतील ज्यामुळे नियोजित आर्थिक विकास साध्य करता येत नाही आणि म्हणूनच भारताताच्या नियोजित आर्थिक विकासाच्या धोरणांच्या यशापयशाचे समिक्षात्मक अध्ययन हा

Bi -monthly Journal

शोध निबंध सादर करण्यात आला. सदर शोध निबंध अनेक अर्थाने महत्वपूर्ण असून या शोध निबंधाचे विविध उद्देश आपण पुढिल प्रमाणे स्पष्ट केले आहेत

**शोध निबंधाचे उद्देश**

१) आर्थिक महासत्तेकडील वाटचालीला तपासणे.

२) क्षेत्रीय सहभागाचे अर्थिक विकासामधीज योगदान जाणून घेणे.

३) विविध योजनांच्या कार्यकाळात झालेल्या आर्थिक वृध्दि दराचा अभ्यास करणे.

४) आर्थिक विकास साध्य करतांना यंणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

५) जागतिक स्तरावर आलेल्या आर्थिक महामंदिचे अध्ययन करणे.

६) जगाच्या तुलनेत भारताने उपलब्ध संसाधनांच्या माध्यमातून केलेल्या आर्थिक विकासाचे अध्ययन करणे.

अशा विभिन्न उद्देशांना सामोरे ठेवून सदर शोध निबंध प्रस्तूत करण्यात आला आहे.

**अध्ययन पध्दती :**

सदर शोध निबंधामध्ये सामाजिक शास्त्रामध्ये अवलंबविण्यात येणारी द्वितीयक तथ्य संकलन प्रस्तूत शोध निबंधामध्ये मासिके, वृत्तपत्रे, शासकिय दस्तावेज,विभिन्न संस्थांच्या माध्यमातून प्रकाशित झालेल्या साहित्याचा आधार घेण्यातआला आहे तसेच भारताची आर्थिक पाहणी अहवालाचा सुध्दा परामर्श घेण्यात आला आहे.

**शोध निबंधाचे गृहितके :**

संशोधन समस्येच्या संदर्भात संशोधकाला काही प्रमाणात पूर्व अनुभव किंवा ज्ञान असते या प्रारंभिक ज्ञानाच्या आधारे अभ्यासक शोध विषयासंदर्भात कोणतेतरी सामान्य अनुमान बांधत असतो आणि हेच अनुमान संशोधनाला दिशा देण्याचे कार्य करत असतात अशा संभावित विधानाला संशोधनामध्ये गृहितके किंवा उपकल्पना म्हणतात. प्रस्तुत शोध विषया संदर्भात असणाऱ्या पूर्व ज्ञानाच्या आधारावर मांडण्यात आलेल्या उपकल्पना खालील प्रमाणे

१) स्वातंत्र्यानंतर विपरीत परिस्थितीत भारताने सर्वागिण आर्थिक विकास साध्य केला आहे.

२) नियोजित प्रयत्नातून आर्थिक विकाससाध्य करण्यात आला आहे.

३) आर्थिक विकासाच्या पहील्या टप्यात कृषीचा वाटा मोठा होता.

४) जागतिकीकरणानंतर आर्थिक विकासाचा वेग वाढला आहे.

५) भारतीय आर्थिक विकास साध्य करतांना अनेक आव्हाने आली आहेत.

६) सर्वागिण आर्थिक विकास साध्य करतांना अडचणी येतात.

जागतिकीकरणापूर्वीचा आर्थिक विकास :

१९५० पासून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न करण्यातआला आणि रचनात्मक आर्थिक विकास करण्याचया प्रयत्नांना सुरवात झाली. परंतु तंत्रज्ञानाचा अभाव, दारिद्र्याचे प्रमाण आणि शेजारी राष्ट्राशी झालेल्या युद्धामुळे पहील्या चार पंचवार्षिक योजनेत आर्थिक विकासाचा अपेक्षित दर साध्य करण्यातभारतीय अर्थव्यवस्थेला अपयश आलेले आपणास दिसुन येते. परंतु या काळात राष्ट्रीय उत्पन्नात झालेली वृध्दि, दरडोई आर्थिक वृध्दि, भांडवल निर्यातीमधील सुधारण, औद्योगिक विकास आणि कृषी उत्पादनात झालेली वाढ या दृष्टिने या पंचवार्षिक योजनांना महत्व प्राप्त झाले आहे.

पंचवार्षिक योजनामध्ये अपक्षित असणारा दर आणि प्राप्त दर दर्शविणारा तक्ता क्र.१

| अ.क्र. | योजना | अपेक्षित दर | प्रत्याक्षातील दर |
|---|---|---|---|
| १ | पहीली | २.१ | २.१ |
| २ | दुसरी | ४.५ | ४.२ |
| ३ | तिसरी | ५.६ | २.८ |
| ४ | चौथी | ५.७ | ३.२ |
| ५ | पाचवी | ४.४ | ४.७ |
| ६ | साहावी | ५.२ | ५.५ |
| ७ | सातवी | ५.० | ५.६ |

या योजनांच्या माध्यमातून झालेला आर्थिक विकास अपेक्षेनुसार झाला नसला तरी या मध्ये रचनात्मकविकास साध्य करण्यास आवश्यक स्थिती निर्माण करणारी प्रक्रिया अवलंबविण्याचा विश्वास भारतीय राज्यकर्त्यांना आणि अर्थतज्ञांना आला. पहील्या बहुतांश पंचवार्षिक योजनामध्ये शेतीच्या उत्पादन वाढीकरिता प्रयत्न करण्यात आले असल्यामुळे व शेती हि निर्सगावर आधारीत असल्यामुळे योजनामध्ये करण्यात आलेल्या तरतुदींना

EIIRJ Bi-monthly Journal

पाहीजे त्या प्रमाणात यश प्राप्त झाले नाही. भारतीय शासनाच्या वतीने कृषी बरोबरच औद्योगिक विकासाला प्रोत्साहन देणाऱ्या योजना राबविण्याकरिता पुढिल योजनांमध्ये प्रयत्न करण्यात आले.

**जागतिकीकरणानंतरचा आर्थिक विकास :**

भारताच्या नियोजित आर्थिक विकासात ८० च्या दशकात अनेक समस्या आल्या आणि देशावर कर्जा बोजा वाढतच चालला होता त्यातच प्राप्त कर्जाचा जास्तीत जास्त भाग हा उत्पादनासाठी न वापरता उपभोगाच्या पूर्ततेकरिता वापरण्यात येत असल्याने देशाची आर्थव्यवस्थेने गंभीर स्वरुप धारण केले होते. देशाला आर्थिक संकटातन बाहेर काढण्यासाठी नविन आर्थिक धोरण स्वीकारल्याशिवाय पर्याय उरला नव्हता म्हणूनच नविन आर्थिक धोरण स्विकारण्यात आले. नविन आर्थिक धोरण स्वीकारल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्वरुपात मुलभूत बदल करण्यात आले हे बदल दुरदृष्टीने आणि नियोजनपूर्व आर्थिक धोरणाच्या कार्यक्रमाकरिता उपयुक्त ठरले. नविन आर्थिक धोरणामध्ये जागतिक स्तरावर स्पर्धा वाढविण्याकरिता प्रयत्न करण्यात आले, आयातीवरील अडथळे दुर करण्यात आले, निर्यात उद्योगांना प्रोत्साहन देवून लघुउद्योगांनाप्रोत्साहन देण्यात आले त्याचाच परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास दरात झालेल्या वध्दिच्या माध्यमातून दिसून येते.

**नविन आर्थिक धोरणानंतरच्या आर्थिक बृध्दिला दर्शविणारा आलेख तक्ता क्र.२**

| अ.क्र. | योजना | अपेक्षित दर | प्रत्याक्षात प्राप्त दर |
|---|---|---|---|
| १ | आठवी | ५.६ | ६.५ |
| २ | नववी | ६.५ | ५.५ |
| ३ | दाहावी | ७.९ | ७.५ |
| ४ | अकरावी | ९.० | ८.० |

EIIRJ
Bi -monthly Journal

वरील तक्त्यामध्ये असणाऱ्या आर्थिक स्थितीचा सखोल विचार केल्यास नविन आर्थिक धोरणामुळे झालेला आर्थिक विकास दिसून येतो. जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यामुळे आठव्या योजनेत अपेक्षित दरापेक्षा जास्त प्रमाणात आर्थिक विकास झाल्याचे दिसून येते. अकरावी योजना देशाच्या आर्थिक विकासाकरिता नांदी ठरणारी असून जगातील आर्थिक महासत्ता असणाऱ्या देशामध्ये आलेल्या महामंदिच्या लाटेतसुद्धा भारतीय

अर्थव्यवस्था प्राप्त करत असणार विकासदर आश्चर्य करणारा आहे आणि भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टिने हि महत्वाची बाब आहे.

आठव्या, नवव्या, दाहाव्या आणि अकराव्या योजनांचा विचार करता देशातील विविध क्षेत्रात वृध्दि व घट पाहावयास मिळते. आठव्या योजनेत कृषी क्षेत्रात वाढ झालेली दिसून येते तर नवव्या योजनेत कृषी क्षेत्रात घट झालेली दिसून येते. उद्योग क्षेत्रात आठव्या योजनेत ७.२९ टक्के असणारा विकास दर नवव्या योजनेत घसरला आणि दाहाव्या योजनेपासून त्यामध्ये वृध्दि आलेली दिसून येते. सेवा क्षेत्रात सुध्दा आठव्या योजनेपासून दाहाव्या योजनेपर्यंत बऱ्याच प्रमाणात वृध्दि झालेली आपणास पाहावयास मिळते. विभिन्न क्षेत्रामध्ये झालेली वृध्दि आपण पुढिल प्रमाणे स्पष्ट करु शकतो

**विविध क्षेत्रातील वृध्दि दर्शविणारा तक्ता तक्ता क्र. ३**

| अ.क्र. | योजना | कृषी | उद्योग | सेवा | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | आठवी | ४.७२ | ७.२९ | ७.१८ | ६.५४ |
| २ | नववी | २.४४ | ४.२९ | ७.८७ | ५.५२ |
| ३ | दाहावी | २.३० | ९.१७ | ९.३० | ७.७४ |
| ४ | अकरावी | ४.० | १०.११ | ९.११ | ९.०० |

**जागतिक मंदि आणि भारतीय अर्थव्यवस्था :**

अमेरिकेमध्ये झालेल्या अनेक घटनांचा प्रभावमुळे जागतिकमंदिचा सामना अनेक देशांना करावा लागला आणि अंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक विकास प्रभावीत झालेला पाहावयास मिळतो. भारतावरही या जागतिक मंदिचा प्रभाव पडला परंतु जागतिक मंदिचे गंभीर परिणाम मात्र भारतीय अर्थवयवस्थेवर होवू शकले नाहीत. आर्थिक विकासाचा दर प्राप्त करण्यात मात्र जागतिक मंदिमुळे अडथळा निर्माण झालेला आपणास पाहावयास मिळतो.जागतिक मंदिमुळे भारतातीलरोखे बाजार, विदेशी विनिमय, देशी व्यवसाय, मुद्रा बाजार, अधिकोश व्यवस्था यावर परिणाम झालेला आपणास दिसतो.उत्पादन क्षेत्रात आलेल्या विपरित परिस्थितीचा परिणाम अनेक

कंपन्यांनी कर्मचारी संख्या कमी केली आणि अकराव्या योजनेत अपेक्षित असणारा विकासाचा दर ८.० टक्के राहण्याची अपेक्षा आहे. जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या खनिज तेलाच्या संकटाचा परिणाम भारतीय आर्थिक विकासावर दिसून येतो कारण त्यामुळे कच्यातेलाच्या किमतीत वाढ झाली आणि परिणामत: जास्त खर्च इंधनावर होत असल्याचे निर्दशनास येते.

भारतीय अर्थव्यवस्थेचे यश म्हणजे भारतामध्ये दिसणारी चलनवाढ होय जागतिक स्तरावर कमी होणारी मंदिची लाट आणि भारतीय चलनवाढ अर्थव्यवस्थेच्या दृष्टिने महत्वाचे प्रतिपादीत होते. २००८-२००९ मध्ये १२ टक्के असणारी चलनवाढ २०११-२०१२ मध्ये सुध्दा याच दरम्यान असल्याचे दिसून येते. चलनवाढीचा परिणाम आर्थिक विकासावर होत असतो आणि म्हणूनच भारतीय अर्थवयवस्थेवर याचा परिणाम होवू नये याकरिता आर.बी.आय आणि भारत सरकार उपाययोजना करत आहे परंतु हे उपाय पुरेशे नसल्यामुळे योग्य उपाय करणे भारतीय शासनाच्या दृष्टिने अत्यंत आवश्यक आहे.

**शोध निबंधाचे निष्कर्ष :**

१) स्वातंत्र्यानंतर स्वीकारण्यात आलेल्या आर्थिक विकासाच्या धोरणाचा प्रभाव भारताच्या आर्थिक विकासावर झालेला दिसून येतो.

२) पहील्या सात योजनामध्ये असणाऱ्या विकासाचा दर अत्यंत कमी असल्याचे दिसून येते.

३) अनियमित कृषी उत्पादनावर अवलंबून असणाऱ्या अर्थव्यवस्थेमुळे देशाचा आर्थिक विकास मंद गतीने झालेला दिसून येतो.

४) नविन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यामुळे अर्थव्यवस्थेने विकासाच्या दिशेने मार्गक्रमण केलेले दिसते.

५) आठव्या पंचवार्षिक योजनेपासून अर्थव्यवस्थेने बहुतांश वेळा अपेक्षित विकास दराला प्राप्त केलेले दिसून येते.

६) जागतिकीकरणामुळे नियोजित आर्थिक विकास साध्य करण्यात भारतीय अर्थव्यवस्थेला यश प्राप्त झालेले दिसून येते.

७) सर्वांगिण आर्थिक विकास साध्य करण्यात नविन आर्थिक धोरणाला यश आल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ सुचि**

१) पुरोहित वसुधा, भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक्स, औरंगाबाद

२) अर्थबोध पत्रीका, मे २०११, भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी,पुणे

३) दैनिक लोकसत्ता, दिनांक ०२ व १५ जून २०११

४) Business & Economy, ३१-०३-२०११

५) Eleven five year plane, २००७-२०१२, vol.१